**SHRI SHIVAJI EDUCATION SOCIETY AMRAVATI'S**

**SHRI SHIVAJI ARTS, COMMERCE AND SCIENCE MAHAVIDYALAYA, MOTALA DIST.BULDANA**

**DEPARTMENT OF MARATHI**

**ACADEMIC YEAR- 2022 – 2023**

**सावित्रीबाई फुले जयंती**

**03/01/2023**

---

# Report

श्री शिवाजी कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय मोताळा येथे मराठी विभागाद्वारे स्त्री शिक्षणाच्या प्रणेत्या क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांची जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मा. प्राचार्य डॉ. गजानन जाधव सर होते. प्रमुख वक्ते प्रा. सुनील मामलकर व IQAC co-ordinator प्रा. अविनाश मेहेरकर यांची उपस्थिती लाभली होती.

प्रा. डॉ. सुनील मामलकर सरांनी क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या जीवन व कार्यावर प्रकाश टाकतांना सांगितले की सावित्रीबाईनी मानवता, समानता, स्वातंत्र्य आणि न्याय या तत्वांसाठी आयुष्यभर लढा दिला. स्त्रियांवर लादलेल्या भेदभाववादी सीमांच्या विरोधात जोरदारपणे भाष्य केले.

अध्यक्षीय भाषणातून मा. प्राचार्य डॉ. गजानन जाधव सर यांनी सावित्रीबाई फुले या पहिल्या महिला शिक्षिका होत्या. जाती व्यवस्थेविरुध्द निर्भयपणे त्यांनी कसा लढा दिला विधवांचे पुनर्वसन व्हावे, पिडीत निराश्रित स्त्रियांना आधार देवून माणूस म्हणून जगता यावे यासाठी केलेला जीवनसंघर्ष याबद्दल विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

प्रास्ताविक प्रा. सौ. नंदा मास्कर मॅडम यांनी केले. सूत्रसंचालन प्रा. दादा मनगटे व आभारप्रदर्शन प्रा. पराग ब्राम्हणकर यांनी केले. या कार्यक्रमाला प्रा. दिनेश ढगे, प्रा. पुरुषोत्तम चाटे, प्रा. डॉ. प्रवीण ठेंग, प्रा. डॉ. चित्रा मोरे, प्रा. डॉ. सुप्रिया बेहेरे, प्रा. भास्कर भिसे, प्रा. निलेश राहाटे, प्रा. नागेश गट्टूवार, प्रा. धीरज चन्नेकर, प्रा. शुभम साखरे तसेच शिक्षकेत्तर कर्मचारी श्री जितेंद्र किरसान, श्री मनोहरे, श्री हिवे, श्री पुरुषोत्तम कुयटे, श्री सुभाष धुरंधर, श्री वासुदेव खाडे, श्री हिरडे, श्री महादेव सोनुने, श्री अमोल बढे इ. ची कार्यक्रमाला उपस्थिती होती.




दैनिक आपला गुजरात बुधवार दिनांक ४ जानेवारी २०२३ बुलडाणा जिल्हा वृत्तविशेष

# श्री शिवाजी कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले जयंती उत्साहात

**मोताळा (प्रतिनिधी)** स्थानिक श्री शिवाजी कला वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय मोताळा येथील राष्ट्रीय सेवा योजना विभागाद्वारे स्त्री शिक्षणाच्या प्रणेत्या क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांची जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. गजाननराव जाधव सर होते. प्रमुख उपस्थिती मध्ये महाविद्यालयातील वाणिज्य विभाग प्रमुख प्रा. डॉ. सुनील मामलकर सर आय. क्यू. एसी समन्वयक प्रा. अविनाश मेहरकर सर व प्रा. नंदा मास्कर मॅडम होत्या. अध्यक्षीय मार्गदर्शनात बोलताना महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. गजाननराव जाधव सर यांनी क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांनी केलेल्या जीवन कार्याचा आढावा घेतला. सावित्रीबाई फुले, भारतातील पहिल्या महिला शाळेच्या पहिल्या महिला शिक्षिका होत्या. प्रबळ जातिव्यवस्थेविरुद्ध त्यांनी निर्भयपणे लढा दिला आणि उपेक्षित लोकांच्या उन्नतीसाठी कार्य केले. सावित्रीबाईसाठी मानवता, समानता, स्वातंत्र्य आणि न्याय ही तत्वे अत्यंत महत्वपूर्ण होती. या काळात ज्या काळात स्त्रिया केवळ वस्तू होती, तिने एक स्पार्क पेटविला ज्यामुळे शिक्षणात समानता निर्माण झाली. स्त्रियांवर लादलेल्या भेदभाववादी सीमांच्या विरोधात जोरदारपणे भाष्य केले ज्यामुळे त्यांच्यावर अत्याचार होऊ लागले. भारतातील सामाजिक मुक्तीसाठी धर्मनिरपेक्ष शिक्षणावर त्यांचा भर हा त्यांचा महत्त्वपूर्ण व्यक्तिमत्त्वाचा ठसा होता. महाविद्यालयातील प्रा. डॉ. सुनील मामलकर प्रा. नंदा मास्कर प्रा. अविनाश मेहकर प्रा. पुरुषोत्तम चाटे प्रा. दिनेश ढगे प्रा. प्रवीण ठेंग डॉ. सुप्रिया बेहरे प्रा. भास्कर भिसे प्रा. निलेश रहाटे प्रा. नागेश गट्टूवार प्रा. धीरज चणेकर प्रा. शुभम साखरे कार्यक्रमाचे संचालन रा.से.यो कार्यक्रम अधिकारी दादा मनगटे व आभार प्रदर्शन प्रा. पराग ब्राह्मणकर यांनी केले यावेळी महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

